# <u>ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग</u>

## दरपत्रक सूचना

राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.तरी सदर प्रशिक्षण कार्यशाळेस सध्यस्थितीमधील कारोना या व्हायरसमुळे संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभुमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह प्रशिक्षण ठिकाणी प्रशिक्षणार्थीना चहा, नाश्ता, भोजन सुविधा पुरविणे करिता खालील अटी व शर्तीस अधिन राहून पुरविण्यासाठी इच्छुक पुरवठादारांकडून दर मागविण्यात येत आहेत :

| अ. क्र. | बाब | उपलब्ध करावयाच्या सुविधा | प्रति नगाची किंमत |
|---|---|---|---|
| १ | शाकाहारी जेवण (अमर्यादित) | साधा भात, डाळ, कुर्मा, चपाती, पापड, लोणचे, कोशिंबीर, सोलकढी. | |
| २ | शाकाहारी जेवण स्पेशल (अमर्यादित ) | साधा भात, डाळ, पालेभाजी, कुर्मा, पुरी, भजी, पापड, लोणचे, कोशिंबीर, सोलकढी, स्वीट डिश. | |
| ३ | मांसाहारी जेवण (अमर्यादित) | साधा भात, चिकन रस्सा, चिकन सुक्का, पुरी, कोशिंबीर, सोलकढी. | |
| ४ | मांसाहारी जेवण (अमर्यादित) | साधा भात, मटन रस्सा, मटण सुक्का, पुरी, कोशिंबीर, सोलकढी. | |
| ५ | मांसाहारी जेवण (अमर्यादित) | साधा भात, मच्छी करी, सुरमई मोठा फ्राय, चपाती, कोशिंबीर, सोलकढी. | |
| ६ | चहा व नाश्ता | सकाळी - शिरा व उपमा किंवा कांदेपोहे स्पेशल चहा<br>सायंकाळी - समोसा/वडा स्पेशल चहा | |

अटी व शर्ती :

१. दिनांक ०७ /११ /२०२० ते दि.१७ /११/२०२० या कालावधीत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे बंद लिफाफयात सादर करणेत यावीत.

२. सदर दरपत्रके दि. / /२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजता ग्रामपंचायत विभाग, जिलहा परिषद सिंधदुर्ग येथे उघडण्यात येतील.

३. पुरवठादार हा शक्यतो स्थानिक क्षेत्रातील अनुभवी असावा त्यांचे स्वत:च्या मालकीचे हॉटेल अथवा खानावळ असावी.

४. सदर प्रशिक्षण ठिकाणी अन्न पदार्थ तयार करणे, पदार्थ वाढवणेसाठी आवश्यक भांडी इ.ची व्यवस्था पुरवठारादाराने करणेची असून उपरोक्त सेवा पुरविण्याकरिता आवश्यक तो कर्मचारी वर्ग असावा.

५. रोजच्या रोज पुरविण्याचा जेवणाचे व नाष्टाची संख्या आदल्या दिवशी लेखी स्वरूपात यासाठी नियुक्त केलेलया समक्ष अधिकारी यांजकडून प्राप्त करून घेवून त्यानुसार पुरवठा दुस-या दिवशी करणेचा आहे.

६. सदर जेवण व नाष्टा हा आरोग्य व पोषण दुष्टया चांगल्या प्रतिचा असणे तसेच सर्व पदार्थ ताजे असणे आवश्यक आहे.

७. आवश्यक तर त्याची तपासणी अन्न व भेसळ प्रतिबंध खात्यामार्फत करुन गुणवत्ता तपासण्यात येईल.

८. उपरोक्त प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास स्वयंम घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. उपस्थिती पत्रकाच्या नोंदीवरून जेवण/नाष्टाचे देयक एनईएफटीव्दारे /पीएफएमएस व्दारे आदा केले जाईल त्यासाठी सदर दरपत्रकात पुरवठादाराचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्र.,भ्रमणध्वनी क्र. असल्यास ईमेल आयडी,असल्यास टॅन/पॅन नं. तसेच खात्याची संपुर्ण माहिती उदा. बँकेचे नाव,शाखा, खाते नं., आय.एफ.एस.सी.कोड इ.नमुद करणे आवश्यक आहे.

१०. दरपत्रक पुरवठाधारकाने पुरवठाधारकाच्या लेटर हेडवर उपरोक्त नमुन्यात व सर्व करांसहित दर सादर करण्यात यावेत.

११. सोबत पॅनकार्डची/आधारकार्ड झेरॉक्स प्रत तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या दाखला व अनुभव प्रमाणपत्र जोडणचे आहेत

१२. सदरचे दर मार्च २०२१ पर्यंत बंधनकारक राहतील.

१३. कोणतेही एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा, संपुर्ण दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याचा, फेर दरपत्रक मागविण्याचे अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे.

१४. दरपत्रकातील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास खाली सही करणार यांचा निर्णय अंतिम राहील.

जा.क्र. सिंजिप/ग्रापं/राग्रास्वअ/भोजन/ 2511 /२०
ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी, दि.०७/११ /२०२०

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

प्रत: नोटीस बोर्ड व जि.प.सिंधुदुर्ग संकेतस्थळावर माहिती व प्रसिध्दीसाठी.